ePaper

## ‘त्यांना संपवण्याची गरज नाही, ते आपल्या कर्मानेच संपले,’ उदय सामंत यांचा उद्धव ठाकरेंना टोला?



| वर्ष - 8 | अंक - 244 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

www.mahaenews.com | सोमवार, दि. 24 मार्च 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**


- राजस्थान रॉयल्सची कडवी झुंज व्यर्थ!
- चेन्नईने चेपॉकवर मिळवला विजय
- वक्फ विधेयक हा संविधानावरील हल्ला
- चीनमधून येणाऱ्या वस्तूंवर अँण्टी-डम्पिंग शुल्क


## कुणाल कामराने उडवली एकनाथ शिंदेंची खिल्ली

# कुणाल की कमाल! शिवसैनिकांची धमाल!

## ‘मेरी नजर से तुम देखो तो गद्दार नजर वो आये’. कुणाल कामराच्या अडचणीत वाढ...

### कुणाल कामरा याच्या सेटची तोडफोड, शिवसैनिकांचा अंधेरीच्या हॉटेलात राडा

| मुंबई | प्रतिनिधी | महाईन्यूज



संबंधित वृत्त पान 5 वर

**स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरील विडंबन करणारे गाणे तयार केल्याने त्याच्या अंधेरी एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सेटची ४० ते ५० शिवसैनिकांनी तोडफोड केल्याची घटना घडली आहे. कुणाल कामरा याच्या गाण्याचा व्हिडीओ नुकताच शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी प्रसारमाध्यमांवर शेअर केला होता. त्यानंतर शिवसेनेच्या नेत्या शीतल म्हात्रे यांनी असा प्रकार खपवून घेतला जाणार नाही असा इशारा दिला होता.त्यानंतर काही मिनिटांनी हा हल्ला झाला आहे. खार येथील युनी कॉंटीनेंटल हॉटेलात घुसून शिवसैनिकांनी स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा याचा सेट तोडला आहे. या प्रकरणात शिवसैनिक मुरजी पटेल स्वत: अंधेरी पोलिस ठाण्यात दाखल झाले आहेत.**



महाराष्ट्राच्या राजकारणावर कुणाल कामरा नेहमीच आपल्या नर्म विनोदी शैलीत टीप्पणी करीत असतात. शिवसेनेतून बाहेर आली. राष्ट्रवादी राष्ट्रवादीतून बाहेर आली. हा प्रकाराने सर्वच कन्फूज झाले. हा प्रकार एकाने सुरु केला होता, असे गाण्याचे बोल आहेत. त्याच पुढे ‘ठाणे की रिक्षा, चेहरे पर दाढी, ऑंखो पे चष्मा हाये......मेरी नजर से दोखो तो गद्दार नजर आये....हाय आहे... असे एकनाथ शिंदे यांची टींगल केल्याने शिवसेना आक्रमक झाली होती. मुरजी पटेल यांच्या नेतृत्वाखाली या प्रकरणात अंधेरीच्या एमआयडीसी पोलिस ठाण्यात कुणाल कामरा याच्या विरोधात तक्रार दाखल केली आहे. या तोडफोडी वेळी स्टुडिओत प्रेक्षक होते. त्यांना आधी बाहेर काढण्यात आले त्यानंतर सेटची तोडफोड करण्यात आल्याचे सांगण्यात येते. स्वत: च्या प्रसिद्धीच्या हव्यासाठी अशा प्रकारे आमच्या नेत्याची बदनामी आम्ही खपवून घेणार नाही असे वक्तव्य काही वेळापूर्वी उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केले होते. त्यानंतर काही वेळात हा हल्ला झाला आहे. या प्रकरणात आता पुढील कारवाई काय होणार याकडे लक्ष लागले आहे. स्टँड अप कॉमेडियन कुणाल कामराने एक व्हिडीओ पोस्ट केला आहे. या व्हिडीओत तो उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर विडंबन करणारं गाणं म्हणताना दिसतो आहे. या गाण्यात त्याने एकनाथ शिंदेंचा उल्लेख गद्दार असा केला आहे. हा व्हिडिओ संजय राऊत यांनी पोस्ट केला आहे. यामुळे आता नव्या वादाला तोंड फुटण्याची चिन्हं आहेत.

### कुणाल कामरा काय म्हणतो?

*“महाराष्ट्र इलेक्शन में इन्होने जो किया है बोलना पडेगा. यहांपे पहले इन्होने क्या किया? शिवसेना बीजेपीसे बाहर आ गयी. उसके बाद शिवसेना शिवसेनासे बाहर आ गयी, एनसीपी एनसीपी बाहर आ गयी. एक व्होटर को नौ बटन दे दिये. सब कन्फ्युज हो गये. चालू एक जन ने किया था. वो मुंबईमें एक बहोत बढिया डिस्ट्रिक्ट है थाने. वहाँ से आते है..” असं कुणाल कामरा म्हणतो आणि गाणं सुरु करतो. या गाण्याला ‘भोली सी सुरत’ या ‘दिल तो पागल है’ या चित्रपटातील गाण्याची चाल आहे. या चालीवर तो म्हणतो ‘मेरी नजर से तुम देखो तो गद्दार नजर वो आये’. हा कुणाल कामराचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला आहे.*

### काय आहे हे प्रकरण?

कॉमेडियन कुणाल कामराने एक व्हिडीओ पोस्ट केला आहे. या व्हिडीओमध्ये त्याने एक गाणं म्हटलं आहे. या गाण्यात त्याने एकनाथ शिंदेंचं नाव घेतलेलं नाही. मात्र हे विडंबनात्मक गाणं एकनाथ शिंदेंच्या विरोधातलं आहे हे स्पष्ट कळतं आहे. हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

### खासदार संजय राऊत यांनी पोस्ट केला व्हिडीओ

कुणाल कामराचा हा व्हिडीओ खासदार संजय राऊत यांनीही पोस्ट केला आहे. कुणाल की कमाल! जय महाराष्ट्र! असं म्हणत हा व्हिडीओ संजय राऊत यांनी शेअर केला आहे. या व्हिडीओवरुन आता वाद ओढवण्याची शक्यता आहे.

## लाडकी बहीण योजनेतील पात्र महिलांची छाननी

# गरजू महिलांचे निकष स्पष्ट!

## लाडकी बहीण योजनेसाठी आता पात्र महिला ठरणार?

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील पात्र महिलांना २१०० रुपये देणार असल्याचं महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीच्या जाहीरनाम्यात सांगितलं होतं. तसंच, अर्थसंकल्पात वाढीव रक्कमेची घोषणा केली जाईल, असंही त्यांनी कबुल केलं होतं. परंतु, आता अधिवेशन सुरू असतानाही त्याची अद्याप घोषणा झालेली नाही.**



असं कोणीही म्हणालं नसल्याचं सरकारने म्हटलं आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून या योजनेतील पात्र महिलांची छाननी केली जात असून तक्रारी प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्यात येणार असल्याची भूमिका सरकारची आहे. यामध्ये कोणत्या निकषांतर्गत महिलांना अपात्र ठरवण्यात येणार याबाबत उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. अजित पवार म्हणाले, लोक तुम्हाला विचारतील २१०० रुपये देणार होते, त्याचं काय झालं? त्यांना म्हणावं, महायुतीने शब्द दिलाय. पाच वर्षांचं सरकार आहे. मुलभूत प्रश्न सोडवल्यानंतर परिस्थितीनुरुप निर्णय घेतले जातील.

काहीजण म्हणत होते की योजना बंद होईल. पण महिलांनो, लाडक्या बहिणींनो गरीब महिलांकरिता ही योजना आहे."असं सांगत असतानाच लाडक्या असलेल्या गरजू महिला नक्की कोण? याबाबत आज अजित पवारांनी स्पष्ट केलं. ते म्हणाले, "ज्या महिलांचं वार्षिक उत्पन्न २ लाख ५० हजाराच्या आत आहे, कुरपण करणारी, धुणीभांडी करणारी, झाडू पोछा करणारी, झोपडपट्टीत कष्टाचं जीवन जगणारी, निराधार महिलांना या योजनेसाठी पात्र आहेत. तसंच, ज्यांना त्यांची मुलं, मुली, सुना, जावई सांभाळत नाहीत, अशांना ही योजना आहे. त्यांचीही संख्या मोठी आहे", असं अजित पवारांनी स्पष्ट केलं."ज्यांना आर्थिक परिस्थिती चांगली असतानाही पैसे दिले गेले ते परत घेणार नाहीत. रक्षाबंधन आणि भाऊबीजेची ओवाळणी दिली. होळीच्या निमित्ताने तीन हजार रुपये दिले. आदिती तटकरेंचाही या योजनेसाठी पाठपुरावा सुरू आहे. इतरही योजनांना न्याय देण्याचं काम महायुती सरकारचं आहे", असं अजित पवार म्हणाले. तसंच, याच अर्थसंकल्पात घोषणा केली जाईल, असं कोणीही म्हणालं नसल्याचं सरकारने म्हटलं आहे. दरम्यान, या योजनेतील पात्र महिलांची छाननी केली जात असून तक्रारी प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्यात येणार असल्याची भूमिका सरकारची आहे. यामध्ये कोणत्या निकषांतर्गत महिलांना अपात्र ठरवण्यात येणार याबाबत उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे.

### परिस्थितीनुरुप निर्णय घेतले जातील

अजित पवार म्हणाले, लोक तुम्हाला विचारतील २१०० रुपये देणार होते, त्याचं काय झालं?पाच वर्षांचं सरकार आहे. मुलभूत प्रश्न सोडवल्यानंतर परिस्थितीनुरुप निर्णय घेतले जातील. काहीजण म्हणत होते की योजना बंद होईल. पण महिलांनो, लाडक्या बहिणींनो गरीब महिलांकरिता ही योजना आहे."असं सांगत असतानाच लाडक्या असलेल्या गरजू महिला नक्की कोण?


---

## श्रीमंती मिळविण्यासोबतच ती टिकविणे गरजेची!

## श्रीमंती ही केवळ पैशातूनच मोजली जात नाही : अनिकेत यादव

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**श्रीमंती ही केवळ पैशातूनच मोजली जात नाही, पैसा व शरीरासोबत मनाची श्रीमंती तितकीच महत्वाची आहे. श्रीमंती मिळविणे सोपे असते पण ती टिकवणे गरजेचे आहे, कुटुंबाला आर्थिक साक्षरता शिकविणेही गरजेचे आहे, असे प्रतिपादन व्याख्याते अनिकेत यादव यांनी केले. एन्व्हॉर्यमेंटल फोरम ऑफ इंडियाच्या वतीने आयोजित प्रतिबिंब व्याख्यानमालेमध्ये तुम्हाला श्रीमंत व्हायचय का ! अनिकेत यादव यांनी बारामतीकरांशी संवाद साधला.**




पैशाने श्रीमंत होण्यासोबतच मनानेही श्रीमंत असणे गरजचे आहे असे सांगून यादव म्हणाले, श्रीमंती मिळविता येते पण ती टिकवून ठेवणे गरजेचे आहे. तीन पिढ्यांपर्यत श्रीमंती बहुसंख्य वेळा टिकते पण काहीही काम न करणा-या कुटुंबाची श्रीमंती टिकत नाही. पैसे मिळविणे व ते टिकविणे ही एक कला आहे.आपण आपल्याला उत्पन्न नाही वाढविता आले तरी चालेल पण तुमचा खर्च कमी करण्याकडे लक्ष केंद्रीत करा. आपण खर्चाला प्रचंड वाटा निर्माण करतो, त्या मुळे अनेकदा कुटुंबियांमधील संबंधही ताणले जातात.खर्च कमी करुन उत्पन्न वाढविणे, मिळालेल्या उत्पन्नाची गुंतवणूक योग्य ठिकाणी करणे व त्यातून पुन्हा उत्पन्न वाढविल्यास लवकर श्रीमंत होता येईल. जेवढी गुंतवणूक चांगली होईल, तितके भविष्यातील अपेक्षा पूर्ण होतात.केवळ स्थावर मालमत्तेत गुंतवणूकीचाच पर्याय न निवडता इतर पर्यायही शोधले पाहिजेत, जेणेकरुन उत्पन्न वाढू शकते. अनुत्पादक गोष्टींसाठी अजिबात कर्ज घेऊ नका, अन्यथा कर्जाच्या खाईत तुम्ही जाऊ शकाल. अनावश्यक कर्ज लवकर फेडून टाका. हिशेब लिहायची सवय प्रत्येकाने लावून घ्यायला हवी. त्या मुळेही आपण कोठे आहोत, हे आपले आपल्याच समजेल.पैशाने श्रीमंत होण्यासोबतच मनानेही श्रीमंत असणे गरजचे आहे असे सांगून यादव म्हणाले, श्रीमंती मिळविता येते पण ती टिकवून ठेवणे गरजेचे आहे.

### पैसे टिकविणे ही एक कला आहे

तीन पिढ्यांपर्यत श्रीमंती बहुसंख्य वेळा टिकते पण काहीही काम न करणा-या कुटुंबाची श्रीमंती टिकत नाही. पैसे मिळविणे व ते टिकविणे ही एक कला आहे.आपण आपल्याला उत्पन्न नाही वाढविता आले तरी चालेल पण तुमचा खर्च कमी करण्याकडे लक्ष केंद्रीत करा. आपण खर्चाला प्रचंड वाटा निर्माण करतो, त्या मुळे अनेकदा कुटुंबियांमधील संबंधही ताणले जातात.

## पिंपळे सौदागर येथे पर्यावरण प्रेमी, नागरिक एकत्र

# नदी वाचवण्यासाठी 'मानवी साखळी'!

## नदी वाचवा निसर्ग टिकवा" पर्यावरण प्रेमींनी दिल्या घोषणा

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नदी काठ विकास प्रकल्पाला विरोध करत पिंपळे सौदागर येथील लिनियर गार्डनजवळ पर्यावरण प्रेमी नागरिक एकत्र आले. "नदी वाचवा, निसर्ग टिकवा" अशा घोषणा दिल्या. यावेळी नागरिकांनी मानवी साखळी करत शहरातील नद्यांचा ऱ्हास रोखण्याची मागणी केली.**



पवना, मुळा आणि इंद्रायणी नदीच्या संवर्धनाविषयी स्थानिक स्वयंसेवी संस्था आणि जागरूक नागरिक रविवारी एकत्र आले या आंदोलनामध्ये 200 हून अधिक नागरिकांनी सहभाग घेतला. नदी संवर्धनासाठी नदीकाठ विकास प्रकल्प केला जात आहे. यामुळे पशुपक्ष्यांचा नैसर्गिक अधिवास धोक्यात आला आहे याशिवाय नद्यांचे पात्र देखील विस्कळीत होणार असल्याचा आरोप नागरिकांचा आहे. यामुळे नागरिकांनी आंदोलन केले. या आंदोलनात एकत्र येत, नद्यांचे नैसर्गिक स्वरूप अबाधित ठेवण्याची मागणी केली. आंदोलनकर्त्यांनी यावेळी नागरिकांना नदीकाठ विकास प्रकल्पामुळे उद्भवणाऱ्या धोक्यांविषयी माहिती दिली.

### "वृक्षतोड थांबलीच पाहिजे!

"आधी नद्या स्वच्छ करा!" आणि "नद्या वाचवू, निसर्ग टिकवू!" अशा घोषणा देत आंदोलनकर्त्यांनी नदीसंवर्धनाचा संदेश दिला. नदीकाठी बांधकाम करण्याऐवजी कचरा व्यवस्थापन आणि प्रदूषण नियंत्रण यावर लक्ष केंद्रित करण्याची मागणी आंदोलकांनी केली. त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास लवकरच अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला. याआधी ९ मार्च रोजी चिंचवडमधील चाफेकर चौकात आणि १५ मार्चला बालेवाडीत मानवी साखळी करून जनजागृती करण्यात आली होती. आज पिंपळे सौदागरमध्ये हे आंदोलन करण्यात आले. पुढील टप्प्यात शहरातील वेगवेगळ्या भागात जनजागृती मोहीम राबवली जाणार आहे असे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

---

## संस्कृतीचे जतन देशाच्या ऐक्यासाठी गरजेचे-उमा खापरे

## पिंपरी चिंचवडमध्ये आयोजित तीन दिवसीय लोकोत्सवाचा समारोप

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकोत्सवामुळे पिंपरी चिंचवडकरांना महाराष्ट्र व ओरिसा मधील आदिवासी लोक संस्कृतीचा कलाविष्कार पाहण्याची संधी मिळाली. हा ठेवा अनुभवणे म्हणजे सामाजिक परंपरा, संस्कृतीचे जतन करणे देशाच्या ऐक्यासाठी नितांत गरजेचे आहे हे स्पष्ट झाले. यासाठी पिंपरी चिंचवड सोशल फाउंडेशने समन्वयाची भूमिका महत्त्वाची होती, असे मत विधानपरिषदेच्या आमदार उमा खापरे यांनी व्यक्त केले.**




महाराष्ट्र सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, भारत सरकार उदयपूर यांच्या संयुक्त विद्यमाने, एक भारत श्रेष्ठ भारत अंतर्गत - लोकोत्सव हा महाराष्ट्र व ओरिसा राज्यातील संस्कृतीचे दर्शन घडविणारा तीन दिवसीय उत्सवाचा शनिवारी (२२ मार्च) प्रा. रामकृष्ण मोरे सभागृह, चिंचवड येथे समारोप झाला. या लोकोत्सवाचे संयोजन पिंपरी चिंचवड सोशल फाउंडेशनने केले केले होते. यावेळी प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, माजी महापौर केशव घोळवे, माजी नगरसेवक राजू दुर्गे, महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक संचालनालयाच्या पुणे विभागीय अधिक्षक जान्हवी जानकर, पिंपरी चिंचवड सोशल फाउंडेशनचे मुख्य समन्वयक प्रवीण तुपे, अनिल गालिंदे, मलाप्पा कस्तुरे आदी उपस्थित होते.

समारोप समारंभात मुंबई येथील रूद्राक्ष कला विष्कारच्या कलाकारांनी 'महाराष्ट्र सोहळा संस्कृतीचा' यामध्ये गण, गवळण, लावणी, वासुदेव, गोंधळ, शेतकरी नृत्य, पोतराज, कोळी नृत्य असे विविध प्रकार सादर करून रसिकांची मने जिंकली. नृत्य दिग्दर्शन उमेश देसाई व राजेश शिर्के आणि सूत्रसंचालन संतोष पेटकर यांनी केले. त्यानंतर ओरिसा येथील कौशल फोक ग्रुप मधील कलाकारांनी थापा नृत्य, दालखाई नृत्य सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवली. यावेळी उमेश देसाई, नवगंध दास आणि कलाकारांचा आ. उमा खापरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

मुख्य समन्वयक प्रवीण तुपे, अनिल गालिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली गजानन चिंचवडे, सुनील पोटे आदींनी कार्यक्रमाचे संयोजन केले. सूत्रसंचालन अभिजित कोळपकर यांनी केले. आभार अविनाश आवटे यांनी मानले.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### प्रपंचात भगवंताची नड आहे असे वाटले पाहिजे.

प्रत्येक माणसाला आपण सुखी असावे असे वाटते; भगवंताची कृपा आपल्यावर असावी, नामाचे प्रेम आपल्याला यावे असे वाटते. पण हा अनुभव आपल्याला का बरे येत नाही ? जगामध्ये पाहताना कुणी मनुष्य सुखी आहे, समाधानी आहे, असे आपल्याला का बरे दिसत नाही? अशी अवस्था असायला काय कारण असावे ? आपण सर्वजण सदाचाराने वागतो असे आपल्याला वाटते. भगवंताचे भजन-पूजन आपण सर्वजण करतो, पण तरी ते समाधान आपल्याला का बरे मिळत नाही ? ते समाधान न मिळायला खरे कारण कोणते असेल तर, आम्हांला अजून भगवंताची नड आहे असे वाटत नाही. भगवंत नसेल तर माझे चालणार नाही, माझ्या समाधानाला त्याची अत्यंत गरज आहे, असे आपल्याला मनापासून वाटतच नाही. प्रपंचात पैसा-अडका असावा, बायको-मुले असावीत, शेतीवाडी, नोकरी-धंदा, इतर वैभव असावे आणि त्याचबरोबर भगवंतही असावा असे आपल्याला वाटते. प्रपंचाची स्थिती कशीही असो, मला भगवंत हवाच, असे आम्हांला तळमळीने मनापासून वाटत नाही. आज, प्रपंचात आम्हांला समाधान मिळेल या आशेने आम्ही प्रपंच करतो, पण इतका प्रपंच करूनही आम्हांला समाधान किती मिळाले याचा तुम्ही विचार करा. अगदी दूर, एका डोंगरावर जाऊन बसा आणि लहानपणापासून आतापर्यंत केलेल्या खटाटोपात समाधान किती मिळाले याचा आढावा घ्या आणि निश्चयाने ठरवा की प्रपंचात मला किती सुख मिळाले. आज इतकी वर्षे प्रपंच करूनही तो आम्हांला सुख देत नाही, हे अनुभवाला येऊनसुद्धा तो टाकावा असे आम्हांला वाटत नाही. प्रपंचात आम्हांला सुख मिळेल ही आमची कल्पनाच नाहीशी व्हायला पाहिजे. प्रपंच आम्हांला शाश्वत समाधान देऊ शकत नाही हे एकदा निश्चयाने ठरले, आणि हा निश्चय एकदा दृढ झाला, म्हणजे मग भगवंताची गरज आम्हांला भासू लागेल आणि मग त्याच्या प्राप्तीसाठी आम्ही केलेल्या प्रयत्नाच्या आड जग, परिस्थिती वगैरे काहीही येऊ शकणार नाही. भगवंत मला पाहिजेच हे विचाराने ठरल्यावर, त्याचे प्रेम आम्हांला यावे असे आपल्याला वाटू लागेल, आणि त्याचीच आपल्याला आज खरी गरज आहे. हे भगवंताचे प्रेम कशाने बरे निर्माण करता येईल ? भगवंताचे प्रेम यायला एकंदर तीन मार्ग आहेत. पहिला मार्ग म्हणजे संतांची संगती करणे; दुसरा मार्ग म्हणजे सद्विचाराची जोपासना करणे; आणि तिसरा मार्ग म्हणजे अखंड नामस्मरण करणे. त्यांपैकी ज्याला जो जुळेल तो त्याने करावा.

**बोधवचन:- भगवंत हवासा वाटणे यामध्ये सर्व मर्म आहे.**



## 'स्टेट'मेंट


अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक


**नागपूरमध्ये गेल्या आठवड्यात जिहादींनी व्यवस्थित नियोजन करून, अचूक वेळ साधून हिंदू-मुस्लीम दंगल घडवून आणली. खरं म्हणजे ती दंगल नव्हतीच! शस्त्रांनी सज्ज असलेल्या मुस्लिमांनी बेसावध हिंदूंवर केलेला तो हल्लाच होता ! त्यात हिंदूंच्या मालमत्तेचे अपरिमित नुकसान झाले, हे महत्त्वाचे !**

# 'औरंग्या फॅन क्लब' मधील दुतोंडी गांडुळांची गरळ !



### कणखर मुख्यमंत्री वसुली करणार !

राज्याचे कर्तव्यकठोर आणि कणखर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संदर्भात आता मोठा निर्णय घेतला आहे, त्याबद्दल त्यांचे प्रथम कौतुक ! दंगलीनंतर शंभरावर जिहादींची धरपकड झाली, एफ.आय.आर. दाखल झालेल्यांची संख्या सुद्धा पाऊणशेच्या घरात गेली. आता झालेल्या नुकसानीची भरपाई या जिहादींकडून करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. नुकसानीचे पंचनामे करून त्यांना हे पैसे दिले जाणार आहेत. नाहीतर अशा गुन्हेगारांच्या मालमत्ता जप्त करण्याचे आदेशही त्यांनी दिले आहेत.

### जे घडले ते वाईटच..

नागपूर मध्ये १९ मार्चच्या रात्री जे घडले, ते अत्यंत निंदनीय आणि वाईटच आहे. जिहादींनी या शांतताप्रिय शहरात अक्षरशः हैदोस घातला, त्यात गैर मुस्लिम म्हणजेच हिंदू-बौद्ध-जैन-शीख जे कोणीही असेल त्याच्या संपत्तीची जाळपोळ केली, त्यांची पूर्णपणे वाट लावली..!

### शिल्लक सेनेकडून पोळी भाजणे सुरू..

राजकीय वातावरण पेटलेले असताना आयती पोळी भाजण्याचा नवा धंदा उबाठा गटाच्या शिल्लक सेनेकडून नेहमीच केला जातो. त्यात स्वतः उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, संजय राऊत आणि त्यांची उरली सुरली पिलावळ बिनाधारेच्या शाब्दिक तलवारी बाहेर काढून हवेत वार सुरू करतात, तोच प्रकार यावेळी झाला.

### हिरवे पुरोगामित्व झळकू लागले..

या पार्श्वभूमीवर वास्तविक सरकारच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहून वक्तव्य करायला हवे, पण आपले 'आलमगीर उध्दव ठाकरे' यांचे हिरवे पुरोगामित्व झळकायला लागले. स्वतः उद्धव ठाकरे यांनी भाजपावर निशाणा साधत 'भाजप हिंदू मुस्लिम करते', 'दोघांमध्ये फाटाफूट पाडते' अशी टोलेबाजी केली, तर त्यांचे खास संजय राऊत यांनी भाजपा नेत्यांच्या मुलांवर तोंडसुख घेतले. यांची मुले कुठे भारतात असतात? ती मुले मात्र दुबईला जाऊन क्रिकेट बघतात, शिक्षणाला, नोकरीला परदेशातच असतात. त्यांना दंगलीचे काय? असे तारे तोडले!

### या नतद्रष्टांना विचारधारा बदलण्याचा आजार

आपल्या समाजामध्ये एखाद्याला विसरण्याचा आजार असतो, हे मान्य..पण, या 'औरंग्या फॅन क्लब' च्या नेत्यांना विचारधारा बदलण्याचा आजार आहे. हे तथाकथित नेते स्वतःचे किंवा स्वतःच्या पक्षाचे मुस्लिमविरोधी वक्तव्य जाणून बुजून विसरतात, त्याची अनेक उदाहरणे महाराष्ट्राने पाहिली आहेत आणि उबग येऊन त्यांना सत्तेपासून कोसो दूर ठेवले आहे.

### ही त्यांची वक्तव्ये आठवतात का?

अशा नाजूकप्रकरणी त्यांनी काढलेली काही 'अजरामर' वक्तव्ये आठवतात का? एक म्हणजे 'शिवराय होते, म्हणून आपण हिंदू आहोत, नाहीतर रोज नमाज पठण करायला लागले असते.' 'बाबरी शिवसेनेने पाडली..' उद्धव ठाकरे यांनी तर अनेक मुस्लिम विरोधी विधाने केली आहेत. प्रसंग बदलला की यु-टर्न मारायचा आणि हिंदूंना झोडपणारी बेछूट विधाने करायची ही त्यांची परंपरा होऊ लागली आहे.

### बाळासाहेबांची रोखठोक विधाने..

वंदनीय बाळासाहेब ठाकरे उघडपणे म्हणायचे, की 'बाबरी पाडणारे आम्हीच'! अजूनही त्यांचे एक वादग्रस्त भाषण वायरल होत असते, ज्यात बाळासाहेब म्हणाले होते, की शपथ घ्यायची तर ही घ्या, जसे ते एकवटले, तसेच आम्ही सुद्धा एक होऊ. लांड्याना टक्कर देऊ..नाहीतर ते देश गिळतील. कुठे ते बाळासाहेब आणि कुठे उद्धव ठाकरे आणि त्यांची शिल्लक सेना!

### संजय राऊत नुसतेच बोल बच्चन !

उद्धव यांचा 'हिज मास्टर्स व्हॉईस' आणि रोज सकाळी बोल बच्चनगिरी करणाऱ्या संजय राऊत २०१९ आधी म्हणायचे की 'मुस्लिमांचा मतदानाचा अधिकार काढून घ्या'..तेच आज या मुस्लिमांचे तुष्टीकरण करत असून भाजपा आता हिंदू-मुस्लिमांमध्ये आग लावून देशाचे दोन तुकडे करणार ! संजय राऊत यांचे काय झाले आहे, त्यांना भाजपाची कावीळ झाली असल्यामुळे भाजपाला विरोध करता करता ते देशाला विरोध करू लागले आहेत !

### कॉंग्रेसच्या मांडीवर बसताच.. बदलले !

थोडासा इतिहास पाहिला तर २०१९ मध्ये बहुमत मिळाले असताना सुद्धा भाजपला दगा देऊन उद्धव ठाकरे यांनी कॉंग्रेस सोबत जाऊन 'धर्मनिरपेक्ष' बनून मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. तेव्हाचे वक्तव्य आठवते का? 'यापुढे मी हिंदुत्व नाही तर सेक्युलर विचार धारेवर लढेन.' त्यानंतर ते फक्त धर्मनिरपेक्ष झाले नाहीत, तर काही काळातच हिंदूविरोधी सुद्धा बनले.

### प्रत्येक गोष्ट हिंदूंना दुखावणारी..

एका भाषणात भगवा झेंडा आणि श्रीमत भगवत गीतेचा अपमान करून आणि श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमाला गैरहजर राहून त्यांनी जे दिवे पाजळले त्याचा फटका आज नाहीतर उद्या त्यांना बसणार होताच. त्याचा परिणाम म्हणून २०२४ ची विधानसभा निवडणूक झाल्यावर दिसला. हिंदूंनी या 'औरंग्या फॅन क्लब' च्या हिरव्या सेनेचा सुपडा साफ केल्यावर त्यांचे मेलेले हिंदुत्व पुन्हा जागृत झाले. परत पलटी मारून आता शड्डू मारू लागले की 'मी हिंदुत्व सोडल्याचा एक तरी पुरावा दाखवा. वा रे वा उद्धव बाळासाहेब ठाकरे !

### थोडीशी तुलना बाळासाहेबांशी !

वंदनीय बाळासाहेबांशी थोडीशी तुलना केली तर बाळासाहेब १९९० पासून त्यांच्या उजव्या विचारसरणीवर ठाम होते. भले ते सत्तेत असोत किंवा बाहेर असोत, म्हणूनच त्यांची संघटना कठीण काळात टिकून राहिली. त्या काळात देशभरात वाढत्या 'हिरव्या दहशती' ला राजकीय उत्तर देण्यासाठी जातीत पातीत विभागलेल्या सर्व हिंदूंना एकत्र आणून हिंदूचे त्यांनी नेतृत्व केले. म्हणून तेव्हा ती एक वेळ होती, जेव्हा शिवसेना म्हटले की बाळासाहेबांचा कणखर आवाज आणि त्यांची भाषणे आठवायची.. भगवा फडकताना डोळ्यासमोर दिसायचा.. आठवायचे ते म्हणजे धर्मअभिमानी हिंदू!

### नेमकी कोणती विचारधारा?

उद्धव यांची शिल्लक सेना आता नेमक्या कोणत्या विचारधारेवर चालली आहे, हेच समजेनासे झाले आहे. किंबहुना त्यांच्या विचारांना आता दिशाच राहिली नाही. धड हिंदुत्व नाही, धड मुस्लिमांचे लांगुलचालन नाही, धड कम्युनिझम नाही आणि धड कोणताच विचार नाही. रोज त्यांचा एक एक शिलेदार गळतो आहे, आणि तरीही त्यांचे डोळे उघडत नाहीत. असेच चालू राहिले तर कसेबसे निवडून आलेले वीस आमदार तरी शेवटपर्यंत राहणार का? हा खरा प्रश्न आहे. त्यात त्यांना सल्लागार भेटले आहेत, ते शकुनी मामा आणि मंथरा अक्का..याचाच अर्थ विनाश हा ठरलेला! थोडक्यात काय तर 'विपरीत काले विनाश बुध्दी' अशी त्यांची अवस्था आहे, हे नक्की!


**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मेरी नजरसे तुम देखो तो गद्दार...!

## कामराने म्हटलेल्या गाण्याचा व्हिडीओ राऊतांनी केला पोस्ट

**। मुंबई ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**स्टँड अप कॉमेडियन कुणाल कामराने एक व्हिडीओ पोस्ट केला आहे. या व्हिडीओत तो उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर विडंबन करणारं गाणं म्हणताना दिसतो आहे. या गाण्यात त्याने एकनाथ शिंदेंचा उल्लेख गद्दार असा केला आहे. हा व्हिडिओ संजय राऊत यांनी पोस्ट केला आहे. यामुळे आता नव्या वादाला तोंड फुटण्याची चिन्हं आहेत.**

कॉमेडियन कुणाल कामराने एक व्हिडीओ पोस्ट केला आहे. या व्हिडीओमध्ये त्याने एक गाणं म्हटलं आहे. या गाण्यात त्याने एकनाथ शिंदेंचं नाव घेतलेलं नाही. मात्र हे विडंबनात्मक गाणं एकनाथ शिंदेंच्या विरोधातलं आहे हे स्पष्ट कळतं आहे. हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.महाराष्ट्र इलेक्शन में इन्होने जो किया है बोलना पडेगा. यहांपे पहले इन्होने क्या किया? शिवसेना बीजेपीसे बाहर आ गयी. उसके बाद शिवसेना शिवसेनासे बाहर आ गयी, एनसीपी एनसीपी बाहर आ गयी. एक व्होटर को नौ बटन दे दिये. सब कन्फ्युज हो गये. चालू एक जन ने किया था. वो मुंबईमें एक बहोत बढिया डिस्ट्रिक्ट है थाने. वहाँ से आते है..” असं कुणाल कामरा म्हणतो आणि गाणं सुरु करतो. या गाण्याला ‘भोली सी सुरत’ या ‘दिल तो पागल है’ या चित्रपटातील गाण्याची चाल आहे. या चालीवर तो म्हणतो ‘मेरी नजर से तुम देखो तो गद्दार नजर वो आये’. हा कुणाल कामराचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला आहे. कुणाल कामराचा हा व्हिडीओ खासदार संजय राऊत यांनीही पोस्ट केला आहे. कुणाल की कमाल! जय महाराष्ट्र! असं म्हणत हा व्हिडीओ संजय राऊत यांनी शेअर केला आहे. या व्हिडीओवरुन आता वाद ओढवण्याची शक्यता आहे.कॉमेडियन कुणाल कामराने संपूर्ण व्हिडीओमध्ये किंवा गाण्यात एकनाथ शिंदे यांचं नाव कुठेच घेतलेलं नाही. मात्र जे गाणं म्हटलं





आहे आणि त्यात जे वर्णन केलं आहे त्यावरुन कुणाल कामरा एकनाथ शिंदेंबाबतच बोलतो आहे हे स्पष्ट होतं आहे. त्यामुळे आता कुणाल कामराच्या अडचणी वाढण्याची चिन्हं आहेत.

एकनाथ शिंदेंनी २०२२ मध्ये बंड करत थेट चाळीस आमदारांना घेऊन शिवसेना सोडली होती. त्यानंतर ते भाजपासह गेले. भाजपाशी हातमिळवणी करुन ते मुख्यमंत्री झाले होते. त्यावेळी उद्धव ठाकरेंचं सरकार कोसळलं होतं. २०२४ मध्ये जेव्हा विधानसभा निवडणूक झाली तेव्हा महायुतीला २८८ पैकी २३७ जागा मिळाल्या. या सरकारमध्ये एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्री आहेत.कॉमेडियन कुणाल कामराने एक व्हिडीओ पोस्ट केला आहे. या व्हिडीओमध्ये त्याने एक गाणं म्हटलं आहे. या गाण्यात त्याने एकनाथ शिंदेंचं नाव घेतलेलं नाही. मात्र हे विडंबनात्मक गाणं एकनाथ शिंदेंच्या विरोधातलं आहे हे स्पष्ट कळतं आहे. हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.महाराष्ट्र इलेक्शन में इन्होने जो किया है बोलना पडेगा. यहांपे पहले इन्होने क्या किया? शिवसेना बीजेपीसे बाहर आ गयी. उसके बाद शिवसेना शिवसेनासे बाहर आ गयी, एनसीपी एनसीपी बाहर आ गयी. एक व्होटर को नौ बटन दे दिये. सब कन्फ्युज हो गये. चालू एक जन ने किया था. वो मुंबईमें एक बहोत बढिया डिस्ट्रिक्ट है थाने. वहाँ से आते है..” असं कुणाल कामरा म्हणतो आणि गाणं सुरु करतो.

या गाण्याला ‘भोली सी सुरत’ या ‘दिल तो पागल है’ या चित्रपटातील गाण्याची चाल आहे. या चालीवर तो म्हणतो ‘मेरी नजर से तुम देखो तो गद्दार नजर वो आये’. हा कुणाल कामराचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला आहे. कुणाल कामराचा हा व्हिडीओ खासदार संजय राऊत यांनीही पोस्ट केला आहे. कुणाल की कमाल! जय महाराष्ट्र! असं म्हणत हा व्हिडीओ संजय राऊत यांनी शेअर केला आहे. या व्हिडीओवरुन आता वाद ओढवण्याची शक्यता आहे.कॉमेडियन कुणाल कामराने संपूर्ण व्हिडीओमध्ये किंवा गाण्यात एकनाथ शिंदे यांचं नाव कुठेच घेतलेलं नाही. मात्र जे गाणं म्हटलं आहे आणि त्यात जे वर्णन केलं आहे .

### कामराच्या अडचणी वाढण्याची चिन्हं

कुणाल कामरा एकनाथ शिंदेंबाबतच बोलतो आहे हे स्पष्ट होतं आहे. त्यामुळे आता कुणाल कामराच्या अडचणी वाढण्याची चिन्हं आहेत. एकनाथ शिंदेंनी २०२२ मध्ये बंड करत थेट चाळीस आमदारांना घेऊन शिवसेना सोडली होती. त्यानंतर ते भाजपासह गेले. भाजपाशी हातमिळवणी करुन ते मुख्यमंत्री झाले होते. त्यावेळी उद्धव ठाकरेंचं सरकार कोसळलं होतं. २०२४ मध्ये जेव्हा विधानसभा निवडणूक झाली तेव्हा महायुतीला २८८ पैकी २३७ जागा मिळाल्या. या सरकारमध्ये एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्री आहेत.स्टँड अप कॉमेडियन कुणाल कामराने एक व्हिडीओ पोस्ट केला आहे. या व्हिडीओत तो उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर विडंबन करणारं गाणं म्हणताना दिसतो आहे.

---

# औद्योगिक क्षेत्रातील खंडणीखोरांचा बंदोबस्त करू

## परप्रांतीयाऐवजी स्थानिकांना रोजगारात प्राधान्य द्यावे : विखे

**। मुंबई ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**जिल्ह्यात औद्योगिक विकासाचे वातावरण तयार केले जात असतानाच काही खंडणीखोरांच्या टोळ्याही जमा होऊ लागल्या आहेत. परप्रांतीयांना रोजगारात प्राधान्य दिले जात आहे. त्यामुळे या खंडणी बहाद्दरांच्या टोळ्यांचा बंदोबस्त करावा लागणार आहे. उद्योजकांनी परप्रांतीयाऐवजी स्थानिकांना रोजगारात प्राधान्य द्यावे. जिथे स्थानिक उपलब्ध होणार नाहीत तिथे परप्रांतीय ठेवावेत. यासाठी उद्योजकांची बैठक घेणार असल्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी आज, बोलताना सांगितले.**



जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीत १२ पैकी १० महायुतीचे आमदार विजयी झाले, त्यांचा सत्कार जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष तथा आमदार शिवाजी कर्डिले यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी मंत्री विखे बोलत होते. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, आमदार मोनिका राजळे, संग्राम जगताप, काशिनाथ दाते, विठ्ठलराव लंघे, अमोल खताळ व विक्रम पाचपुते यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना मंत्री विखे यांनी पुढील महिन्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आहिल्यानगर विस्तारित एमआयडीसीचे भूमिपूजन होणार असल्याची माहिती दिली. पश्चिम वाहिन्यांचे ६५ टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळवण्यासाठी सर्वेक्षण सुरू झाले आहे. ५ वर्षात हे काम पूर्ण केले जाईल. त्यासाठी ४० ते ५० हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. त्यातून नाशिक-आहिल्यानगर- मराठवाडा प्रादेशिक वाद संपेल. दुष्काळी भागास पाणी मिळेल.सभापती राम शिंदे यांनी पालकमंत्री विखे यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्याचा विकासाचे प्रश्न मागील लावू अशी ग्वाही दिली. योगदानामुळेच जिल्हा महायुतीमय झाल्याचे त्यांनी सांगितले. माजी खासदार सुजय विखे म्हणाले, सकाळाई पाणी योजनेसाठी २ टीएमसी पाणी आरक्षित झाले आहे. त्याला प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. दोन महिन्यात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते योजनेचे भूमिपूजन होईल. मी माजी असलो तरी आजी आमदारांच्या ५० पट अधिक काम करू शकतो. त्यामुळे माझे राजकीय पुनर्वसन करण्याचा विचार राम शिंदे व शिवाजी कर्डिले यांनी करावा. आमदार कर्डिले यांनी विजेचा, वावरथ-जांभळी येथील मुळा धरणातील पुलाचा प्रश्न मार्गी लावण्याची तसेच सकाळाईचा प्रश्न मंत्री विखे यांनी मार्गी लावला.

### 5 वर्षात हे काम पूर्ण केले जाईल

जिल्ह्यातील जलसंपदाचे इतर प्रश्नही त्यांनी मार्गी लावावीत अशी मागणी केली. भाजपचे जिल्हाध्यक्ष अक्षय कर्डिले यांनी स्वागत केले. आमदार संग्राम जगताप, मोनिका राजळे, विठ्ठलराव लंघे, विक्रम पाचपुते, काशिनाथ दाते यांची भाषणे झाली.. ५ वर्षात हे काम पूर्ण केले जाईल.

# चीनमधून येणाऱ्या वस्तूंवर अॅण्टी-डम्पिंग शुल्क

## सरकारचा चार उत्पादनांवर अॅण्टी-डम्पिंग शुल्क लागू करण्याचा निर्णय

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारत सरकारने चीनमधून येणाऱ्या पाच उत्पादनांवर अॅण्टी-डम्पिंग शुल्क लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये अॅल्युमिनियम फॉइल, व्हॅक्यूम फ्लास्क, सॉफ्ट फेराइट कोर्स आणि ट्रायक्लोरो असोसायन्युरिक अॅसिड, पॉली व्हाइनिल क्लोराइड पेस्ट रेझिन यांचा समावेश आहे. हे शुल्क पाच वर्षांसाठी लागू करण्याचा निर्णय आता भारत सरकारने घेतला आहे. वाणिज्य मंत्रालयाच्या तपास युनिट डीजीटीआरच्या शिफारशीनंतर हे पाऊल उचलण्यात आलं आहे.**



भारत सरकारने चार चिनी उत्पादनांवर अॅण्टी-डम्पिंग शुल्क लावण्याच्या निर्णयामुळे भारतीय कंपन्यांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.चीनपेक्षा कमी किमतीत भारतात विकल्या जाणाऱ्या उत्पादनांवर हे शुल्क लावण्यात आले आहे. केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळाने या संदर्भातील माहिती देत याबाबतच्या सूचना जारी केल्या आहेत. दरम्यान, अॅल्युमिनियम फॉइलही अँटी डंपिंग शुल्क लावण्यात आलं आहे. मात्र, अॅल्युमिनियम फॉइलवरील हे अॅण्टी-डम्पिंग शुल्क सहा महिन्यांसाठी असणार आहे. अॅल्युमिनियम फॉइल आयातीवर प्रति टन USD ८७३ पर्यंत तात्पुरतं अॅण्टी-डम्पिंग शुल्क लावण्यात आलं आहे. या संदर्भातील वृत्त टाइम्स ऑफ इंडियाने दिलं आहेवाढीव आयात शुल्क अर्थात 'अॅण्टी-डम्पिंग शुल्क' म्हणजेच देशातील उत्पादकांना परदेशातील प्रतिस्पर्धी उत्पादक कंपन्यांकडून हानी पोहोचत असल्यास त्यांची निर्यात किंमत आणि सामान्य मूल्यातील फरकाची भरपाई भरून काढण्यासाठी आयात केलेल्या वस्तूंवर वाढीव कर लादले जातात. थोडक्यात 'अॅण्टी-डम्पिंग' हे देशांतर्गत उद्योगांचे संरक्षण करणारे शुल्क आहे. जे सरकार परदेशातील आयातीवर आकारते. डम्पिंग ही एक अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये एखादी कंपनी एखादे उत्पादन सामान्यपणे त्या देशातील बाजारपेठेत आकारत असलेल्या किमतीपेक्षा लक्षणीयरीत्या कमी किमतीला दुसऱ्या देशात निर्यात करते.अॅण्टी-डम्पिंग' शुल्क हा एक संरक्षणवादी दर आहे जो देशांतर्गत सरकार विदेशी आयातीवर लादते, ज्याची किंमत वाजवी बाजार मूल्यापेक्षा कमी आहे. आपापल्या अर्थव्यवस्थेचे संरक्षण करण्यासाठी अनेक देश त्यांच्या राष्ट्रीय बाजारपेठेत कमी दराने आयात केल्या जात असलेल्या उत्पादनांवर शुल्क लादते. कारण तसे न केल्यास परदेशातून स्वस्तात आयात केल्यामुळे देशांतर्गत स्थानिक व्यवसाय आणि स्थानिक

### डम्पिंग' शुल्क हा एक संरक्षणवादी दर

डम्पिंग ही एक अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये एखादी कंपनी एखादे उत्पादन सामान्यपणे त्या देशातील बाजारपेठेत आकारत असलेल्या किमतीपेक्षा लक्षणीयरीत्या कमी किमतीला दुसऱ्या देशात निर्यात करते.अॅण्टी-डम्पिंग' शुल्क हा एक संरक्षणवादी दर आहे जो देशांतर्गत सरकार विदेशी आयातीवर लादते.

अर्थव्यवस्था धोक्यात येण्याची शक्यता असते. आणखी सोप्या शब्दात सांगायचे झाल्यास जेव्हा एखादी विदेशी कंपनी एखादी वस्तू ज्या किमतीला स्वतःच्या देशात उत्पादित करते. त्या किंमतीपेक्षा लक्षणीयरीत्या कमी किमतीला परदेशात विकते, तेव्हाच देशांतर्गत कंपन्यांना वाचविण्यासाठी हे शुल्क आकारले जाते.भारत सरकारने चार चिनी उत्पादनांवर अॅण्टी-डम्पिंग शुल्क लावण्याच्या निर्णयामुळे भारतीय कंपन्यांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.चीनपेक्षा कमी किमतीत भारतात विकल्या जाणाऱ्या उत्पादनांवर हे शुल्क लावण्यात आले आहे. केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळाने या संदर्भातील माहिती देत याबाबतच्या सूचना जारी केल्या आहेत. दरम्यान, अॅल्युमिनियम फॉइलही अँटी डंपिंग शुल्क लावण्यात आलं आहे. मात्र, अॅल्युमिनियम फॉइलवरील हे अॅण्टी-डम्पिंग शुल्क सहा महिन्यांसाठी असणार आहे. अॅल्युमिनियम फॉइल आयातीवर प्रति टन USD ८७३ पर्यंत तात्पुरतं अॅण्टी-डम्पिंग शुल्क लावण्यात आलं आहे. या संदर्भातील वृत्त टाइम्स ऑफ इंडियाने दिलं आहेवाढीव आयात शुल्क अर्थात 'अॅण्टी-डम्पिंग शुल्क' म्हणजेच देशातील उत्पादकांना परदेशातील प्रतिस्पर्धी उत्पादक कंपन्यांकडून हानी पोहोचत असल्यास त्यांची निर्यात किंमत आणि सामान्य मूल्यातील फरकाची भरपाई भरून काढण्यासाठी आयात केलेल्या वस्तूंवर वाढीव कर लादले जातात. थोडक्यात 'अॅण्टी-डम्पिंग' हे देशांतर्गत उद्योगांचे संरक्षण करणारे शुल्क आहे.

# वक्फ विधेयक हा संविधानावरील हल्ला!

## जयराम रमेश यांचा पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सरकारवर हल्लाबोल

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**गेल्या काही दिवसांपासून वक्फ बोर्ड विधेयकावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये चांगलंच राजकारण सुरु आहे. वक्फ बोर्ड विधेयकाला १४ बदलांसह मंत्रिमंडळाने २७ फेब्रुवारीला मंजुरी दिलेली आहे. हे विधेयक अर्थसंकल्पीय अधिवेशनात संसदेत मांडण्यात आलं होतं. मात्र, त्यानंतर ते संसदीय समितीकडे पाठवण्यात आलं.**



त्यानंतर समितीकडून सुचवण्यात आलेल्या शिफारशींपैकी ४४ शिफारशी नामंजूर करण्यात आल्या तर १४ बदलांसह सुधारित वक्फ बोर्ड विधेयकाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिलेली आहे.दरम्यान, या वक्फ बोर्ड विधेयकावरून काँग्रेसने रविवारी एक निवेदन जारी करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारवर जोरदार टीका केली आहे. काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश निवेदनात म्हटलं की, वक्फ बोर्ड(दुरुस्ती) विधेयक हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारचा संविधानावरील आणखी एक हल्ला आहे. हे विधेयक खोटा प्रचार पसरवून समाजातील सामाजिक सलोखा भंग करणे आणि अल्पसंख्याक समाजाच्या परंपरांना बदनाम करून निवडणुकीच्या फायद्यासाठी ध्रुवीकरणाची परिस्थिती निर्माण करण्याचा सरकारचा उद्देश असल्याचं जयराम रमेश यांनी म्हटलं आहे.जयराम रमेश यांनी म्हटलं की, "वक्फ (दुरुस्ती) विधेयक हा भाजपाच्या रणनीतीचा एक भाग आहे. बहु-धार्मिक समाजातील सामाजिक सलोखा

### अधिकार हिरावून घेण्याचा हा प्रयत्न

या माध्यमातून जेणेकरून समुदायाला त्यांच्या स्वतःच्या धार्मिक परंपरा आणि व्यवहारांचं व्यवस्थापन करण्याचा अधिकार जाणूनबुजून हिरावून घेण्याचा हा प्रयत्न आहे", असंही जयराम रमेश यांनी निवेदनात म्हटलं आहे. "वक्फच्या उद्देशाने कोण त्यांची जमीन दान करू शकते हे ठरवण्यासाठी जाणूनबुजून अस्पष्टता आणण्यात आली आहे.

बिघडवण्याचा त्यांचा हा प्रयत्न आहे. वक्फची जमीन वक्फला देण्याबाबत जाणीवपूर्वक संदिग्धता निर्माण करण्यासाठी वक्फची व्याख्या बदलण्यात आली आहे.
वक्फ बोर्ड कमकुवत करण्यासाठी विद्यमान कायद्यातील तरतुदी विनाकारण काढून टाकल्या जात आहेत. हा अल्पसंख्याक समुदायांच्या परंपरा आणि संस्थांना बदनाम करण्याचा प्रयत्न आहे. जेणेकरून निवडणुकीच्या फायद्यासाठी आपला समाज कायमचा ध्रुवीकरणाच्या स्थितीत राहील", असा आरोप जयराम रमेश यांनी केला आहे.वक्फचे व्यवस्थापन करण्यासाठी मागील कायद्यांद्वारे निर्माण केलेल्या सर्व संस्था (राष्ट्रीय परिषद, राज्य मंडळे आणि न्यायाधिकरण) सक्रियपणे त्यांची प्रतिष्ठा, रचना आणि अधिकार कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

# आमिर खानचं अजब वक्तव्य

बॉलीवूडचा परफेक्शनिस्ट आमिर खानचा मुलगा जुनैद खानचा 'लवयापा' चित्रपट गेल्या महिन्यात प्रदर्शित झाला होता. व्हॅलेंटाइन डेचं औचित्य साधून जुनैदचा चित्रपट ७ फेब्रुवारीला प्रेक्षकांच्या भेटीस आला होता. या चित्रपटात जुनैदसह दिवंगत अभिनेत्री श्रीदेवींची मुलगी खुशी कपूर पाहायला मिळाली होती. पण, जुनैद व खुशीचा हा चित्रपट फ्लॉप ठरला. यावर आता आमिर खानने आपली प्रतिक्रिया दिली आहे. 'इन्स्टंट बॉलीवूड'शी संवाद साधताना आमिर खानला जुनैद खानच्या करिअरबाबत विचारलं. त्यावर आमिर कान म्हणाला, "जुनैदने हिंदी सिनेसृष्टीत जबरदस्त सुरुवात केली आहे. तो खूप टॅलेंटेड आहे. जुनैद जी काही भूमिका करतो, त्यात तो रमून जातो. त्याने 'महाराजा' आणि 'लवयापा' चित्रपटात खूप चांगलं काम केलं आहे."पुढे जुनैदबद्दल आमिर खान म्हणाला की, तो माझ्यासारखा आहे. तो चांगला डान्सर नाहीये. तसंच तो इतर लोकांशी संवाद साधताना थोडा घाबरतो. मुलाखतींमध्येही तो काहीही उत्तरं देतो. पण, जुनैद खूप शिकेल आणि खूप चांगलं काम करेल. त्यानंतर जुनैदचा चित्रपट फ्लॉप होण्याविषयी आमिर खान म्हणाला, "त्याचा 'लवयापा' चित्रपट बॉक्स ऑफिसवर चालला नाही. हे एकप्रकारे चांगलं झालं. यामुळे तो जास्त स्ट्राँग होईल आणि मेहनत करण्यासाठी अधिक प्रेरित होईल. जुनैद सध्या योग्य मार्गावर आहे." 'लवयापा' चित्रपटात एक कपल दाखवण्यात आलं आहे, जे आपापसात फोन बदलण्याचा निर्णय घेतात. त्यानंतर बरेच खुलासे होतात. जे एका बाजूला धक्कादायक असतात. तर दुसऱ्या बाजूला त्यांच्या आयुष्यात मोठे बदल होतात. 'लवयापा' चित्रपटात जुनैद खान, खुशी कपूर व्यतिरिक्त आशुतोष राणा, किकू शारदा यांनी खूपच चांगलं काम केलं आहे.

# तिने माझे हातात हात धरले अन् रडायला लागली

मालिका, नाटक, चित्रपट या तिन्ही माध्यमांमध्ये दमदार काम करणाऱ्या अभिनेत्यांपैकी एक म्हणजे सुयश टिळक. त्यानं आपल्या सुंदर अभिनयानं मराठी मनोरंजनसृष्टीत एक वेगळंच स्थान निर्माण केलं आहे. सध्या त्याचं रंगभूमीवर 'ज्याची त्याची लव्हस्टोरी' हे नाटक जोरदार सुरू आहे. त्याच्या या नाटकाला प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. 'झी नाट्य गौरव २०२५'मध्ये 'ज्याची त्याची लव्हस्टोरी' या नाटकासाठी सुयश टिळकला सर्वोत्कृष्ट अभिनेता या पुरस्काराने गौरविण्यात आलं. १७ वर्षांनी सुयशला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला. या पुरस्कार सोहळ्यानिमित्ताने सुयशने 'ज्याची त्याची लव्हस्टोरी' या नाटकादरम्यानचा एका चाहतीचा हृदयस्पर्शी किस्सा सांगितला. याचा व्हिडीओ सध्या व्हायरल होतं आहे. 'झी मराठी'च्या सोशल मीडियावर सुयश टिळकचा व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे. ज्यामध्ये सुयश किस्सा सांगत म्हणतो, "आता जे माझं नाटक सुरू आहे 'ज्याची त्याची लव्हस्टोरी' त्यासंदर्भात अलीकडेच घडलेला एक किस्सा आहे. या नाटकात मी विवेकची भूमिका करतोय. त्याच्या आयुष्यातली मोठी इनसिक्योरिटी, त्याला आयुष्यात सगळ्यात जास्त कशाची भीती वाटते, ते तो एकेदिवशी सगळ्यांसमोर बोलतो. तर परवा पुण्यात प्रयोग झाला. एक मुलगी आली. तिने माझे हात हातात धरले आणि ती रडायला लागली."

# प्राजक्ता माळीचा जबरदस्त डान्स!



सोनाली कुलकर्णी व स्वप्नील जोशी यांची प्रमुख भूमिका असलेला 'सुशीला सुजीत' चित्रपट गेल्या काही दिवसांपासून चांगलाच चर्चेत आहे. यामधलं 'चिऊताई चिऊताई दार उघड' हे गाणं सुद्धा सर्वत्र ट्रेंड होत आहे. या गाण्यावर सध्या अनेक सेलिब्रिटी थिरकताना दिसत आहेत. 'चिऊताई चिऊताई दार उघड' या मूळ गाण्यात अमृता खानविलकर व गश्मीर महाजनी यांची जबरदस्त केमेस्ट्री पाहायला मिळते. या गाण्यात दोघांनी भन्नाट डान्स केला आहे. डान्सच्या स्टेप्स, वेशभूषा, अमृताचे हटके कानातले या गोष्टींची सोशल मीडियावर विशेष चर्चा रंगली होती.आता या गाण्यावर एक खास जोडी थिरकली आहे. सध्या 'सुशीला सुजीत' चित्रपटाच्या प्रमोशनसाठी यामधले प्रमुख कलाकार विविध कार्यक्रमांना उपस्थिती लावत आहेत. या सिनेमाचा दिग्दर्शक प्रसाद ओक असल्याने नुकतीच 'सुशीला सुजीत'च्या संपूर्ण टीमने 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या शोमध्ये उपस्थिती लावली होती.'महाराष्ट्राची हास्यजत्रा'च्या सेटवर सिनेमाचा प्रमुख अभिनेता स्वप्नील जोशी आणि लोकप्रिय अभिनेत्री प्राजक्ता माळी या दोघांनी मिळून 'सुशीला सुजीत'मधील 'चिऊताई चिऊताई दार उघड' या गाण्यावर जबरदस्त डान्स केला आहे. प्राजक्ता लिहिते, "मला माहिती आहे की, मी 'चिऊताई REEL स्पर्धेचे' सगळे नियम मोडलेत. पण हा व्हिडीओ स्पर्धेसाठी नाही, शुभेच्छांसाठी आहेत. सहकलाकार जे या चित्रपटाद्वारे निर्मिते होतायेत; त्यांना मनापासून आभाळभर शुभेच्छा" हा सिनेमा येत्या १८ एप्रिलला प्रदर्शित होत आहे.दरम्यान, प्राजक्ता माळी आणि स्वप्नील जोशीच्या डान्स व्हिडीओवर अमृता खानविलकरने कमेंट करत "हाय....क्युटेस्ट" असं म्हटलं आहे. याशिवाय प्रसाद ओक, मंजिरी ओक यांच्यासह चाहत्यांनी कमेंट्स करत प्राजक्ता व स्वप्नीलच्या डान्सचं कौतुक केलं आहे. दरम्यान, 'सुशीला- सुजीत'मध्ये स्वप्नील जोशी आणि सोनाली कुलकर्णी पहिल्यांदाच एकत्र स्क्रीन शेअर करणार आहेत.

# श्रेयस आणि प्रार्थना स्टार जोडी ऑनस्क्रीन



टेलिव्हिजनवरच्या काही लोकप्रिय मालिकांनी प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केलेलं आहे. 'वादळवाट', 'अवघाची हा संसार', 'असंभव', 'आभाळमाया', 'होणार सून मी ह्या घरची', 'कळत नकळत' या सदाबहार मालिका चाहत्यांच्या आजही आठवणीत आहे. 'झी मराठी'वरच्या अशाच एका मालिकेने रसिक प्रेक्षकांचं मन जिंकून घेतलं होतं. त्या मालिकेचं नाव आहे 'माझी तुझी रेशीमगाठ'. 'माझी तुझी रेशीमगाठ' ही मालिका 'झी मराठी' वाहिनीवर ऑगस्ट २०२१ मध्ये सुरू झाली होती. या मालिकेचा शेवटचा भाग २२ जानेवारी २०२३ रोजी पार पडला. 'माझी तुझी रेशीमगाठ'मध्ये श्रेयस तळपदे आणि प्रार्थना बेहेरे ही स्टार जोडी ऑनस्क्रीन एकत्र काम करत होती.'माझी तुझी रेशीमगाठ' या मालिकेला प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला होता. यश-नेहाची केमेस्ट्री, नेहाची चिमुकली लेक परी ही सगळी पात्र चाहत्यांच्या पसंतीस उतरली होती. अगदी आजही श्रेयस आणि प्रार्थनाकडे 'माझी तुझी रेशीमगाठ' मालिकेचा दुसरा भाग सुरू करा, अशी मागणी प्रेक्षक करतात. यावरून मालिकेची लोकप्रियता मोठ्या प्रमाणात आहे याचा अंदाज येतो. या मालिकेचा दुसरा भाग केव्हा येईल हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही. पण, लवकरच या मालिकेची स्टारजोडी एका कार्यक्रमात एकत्र परफॉर्म करताना दिसणार आहे.सध्या 'चल भावा सिटीत' या कार्यक्रमाची सर्वत्र जोरदार चर्चा चालू आहे. या शोचं होस्टिंग अभिनेता श्रेयस तळपदे करत आहे. या शोमध्ये एका टास्कदरम्यान प्रमुख पाहुणी म्हणून प्रार्थना बेहेरे उपस्थित राहणार आहे. यावेळी कोरिओग्राफर आशिष पाटील, प्रार्थना आणि श्रेयस अर्थात प्रेक्षकांच्या लाडक्या यश-नेहाला एकत्र डान्स करण्याची विनंती करतो.यानंतर प्रार्थना आणि श्रेयस 'माझी तुझी रेशीमगाठ' या मालिकेच्या शीर्षकगीतावर रोमँटिक डान्स करतात. सध्या हा व्हिडीओ सर्वत्र व्हायरल होत असून, लाडकी जोडी ऑनस्क्रीन पुन्हा एकत्र दिसल्याने चाहते आनंदी झाले आहेत.

# जुई गडकरीचा सन्मान?

'स्टार प्रवाह परिवार पुरस्कार २०२५' हा सोहळा नुकताच पार पडला. या सोहळ्यात 'ठरलं तर मग'ला 'सर्वोत्कृष्ट महामालिका प्रेक्षक पसंती' हा पुरस्कार मिळाला. ही मालिका गेल्या दोन वर्षांपासून छोट्या पडद्यावर अधिराज्य गाजवत आहे. 'ठरलं तर मग' मालिका यंदा सर्वोत्कृष्ट ठरली असली, तरीही या मालिकेतील मुख्य जोडीला या सोहळ्यात एकही पुरस्कार मिळाला नव्हता. 'स्टार प्रवाह'चा पुरस्कार सोहळा पार पडल्यावर 'ठरलं तर मग' मालिकेच्या चाहत्यांनी याबद्दल कमेंट्स सेक्शनमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली होती. टीआरपी टॉपर असलेल्या मालिकेतील मुख्य कलाकार एक तरी अवॉर्ड डिझर्व्ह करत होते अशा कमेंट्स 'स्टार प्रवाह'च्या इन्स्टाग्रामवर नेटकऱ्यांनी केल्या होत्या.मात्र, मुख्य सोहळ्यात एकही पुरस्कार मिळाला नसला, तरी सायलीची भूमिका साकारणाऱ्या जुई गडकरीला एक खास पुरस्कार मिळाला आहे. हा पुरस्कार कोणी दिलाय? जाणून घेऊयात... सायलीसाठी तिच्या चाहत्यांनी खास ट्रॉफी डिझाईन केलीये. हा पुरस्कार घेऊन अभिनेत्रीचे चाहते थेट 'ठरलं तर मग' मालिकेच्या सेटवर पोहोचले होते. या ट्रॉफीवर 'जुई गडकरी- लाडकी लेक ( क्वीन ऑफ हार्ट्स )' असं लिहिण्यात आलं आहे. याचा फोटो अभिनेत्रीने इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे.जुई गडकरी पोस्ट शेअर करत लिहिते, "प्रत्येक ट्रॉफी ही लाखमोलाची असते पण, ही जरा जास्तच खास आहे कारण, ही ट्रॉफी माझ्या कायम हृदयाजवळ राहणार आहे. 'ठरलं तर मग' मालिकेच्या चाहत्यांचे व हितचिंतकांचे खूप खूप आभार. तुम्ही सेटवर येऊन आमची प्रशंसा केली, ट्रॉफी दिली, आमच्यासाठी गिफ्ट्स आणि गोड पदार्थ आणले... मी खरंच तुमची कृतज्ञ आहे. मुलींनो तुमचे खूप खूप आभार...तुम्ही मला 'क्वीन ऑफ हार्ट्स' म्हटलं याचा अभिमान आहे. सर्वात महत्वाचं म्हणजे मी 'क्वीन ऑफ हार्ट्स' असेन तर, तुम्ही सगळ्या 'हॉर्ट ऑफ गोल्ड्स' आहात."दरम्यान, जुई गडकरीने तिच्या चाहत्यांना या पोस्टमध्ये टॅग देखील केलं आहे. चाहत्यांनी दिलेला पुरस्कार, चॉकलेट्स या सगळ्याचे फोटो अभिनेत्रीने इन्स्टाग्राम स्टोरीवर शेअर केले आहेत.'स्टार प्रवाह परिवार पुरस्कार २०२५' हा सोहळा नुकताच पार पडला.



# राजस्थान रॉयल्सची कडवी झुंज व्यर्थ!

## हैदराबादचा अवघ्या 44 धावांनी विजय : संजू-जुरेलची वादळी फलंदाजी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राजस्थान रॉयल्सच्या संजू सॅमसन आणि ध्रुव जुरेल यांनी चांगली झुंज दिली, पण हैदराबादच्या डोंगराएवढ्या लक्ष्यासमोर संघाला विजय मिळवून देऊ शकले नाहीत. २८७ धावांची मोठी धावसंख्या उभारल्यानंतरही राजस्थान संघावर ४४ धावांनी विजय मिळवू शकले आहेत. राजस्थान रॉयल्सच्या फलंदाजांनीही हैदराबादच्या गोलंदाजांची शाळा घेतली पण पॉवरप्लेमध्ये संघाने गमावलेल्या विकेट्समुळे राजस्थानचा संघ मोठ्या धावसंख्येपर्यंत पोहोचू शकला नाही.**




इशान किशनच्या शतकाच्या जोरावर सनरायझर्स हैदराबादने ही मोठी धावसंख्या उभारली. प्रथम फलंदाजी करताना त्याने केवळ ४७ चेंडूत २२५ च्या स्ट्राईक रेटने ११ चौकार आणि ६ षटकारांसह १०७ धावा केल्या. त्याच्या झंझावाती खेळीमुळे हैदराबाद संघाने २८७धावांचे मोठे लक्ष्य राजस्थानसमोर ठेवले होते. प्रत्युत्तरात राजस्थान रॉयल्सचा संघ २४२ धावा करू शकला. संजू सॅमसन आणि ध्रुव जुरेल यांनी स्फोटक खेळी खेळून सामना आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांना या कामगिरीत यश आले नाही.सनरायझर्स हैदराबादने दिलेल्या २८७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या राजस्थान रॉयल्स संघाची सुरुवात चांगली झाली नाही. त्यांना दुसऱ्याच षटकात यशस्वी जैस्वाल आणि रियान परागच्या रूपाने दोन झटके बसले. सिमरजित सिंगने दोन्ही फलंदाजांना बाद करून राजस्थान संघावर दडपण आणलं. पण असे असतानाही संजू सॅमसन एका टोकाकडून षटकार आणि चौकारांचा पाऊस पाडत होता. त्यानंतर ५व्या षटकात नितीश राणाही मोहम्मद शमीचा बळी ठरला. यानंतर ध्रुव जुरेलने सॅमसनसह संघाचा डाव सावरला. दोघांनीही वेगाने धावा काढण्यास सुरुवात केली आणि शतकी भागीदारी करून संघाला पुन्हा रुळावर आणले.मात्र १११ धावांची ही भागीदारी १४व्या षटकात तुटली. १७८च्या स्ट्राईक रेटने ३७ चेंडूत ६६ धावा करून सॅमसन हर्षल पटेलच्या गोलंदाजीवर झेलबाद झाला. त्यानंतर दोन चेंडूत, २०० च्या स्ट्राइक रेटने ३५ चेंडूत ७० धावा करून जुरेलही बाद झाला. ॲडम झाम्पाच्या गोलंदाजीवर तो झेलबाद झाला. दोघेही पॅव्हेलियनमध्ये परतल्यानंतर राजस्थानची गाडी पुन्हा रुळावरून घसरली. पण शिमरन हेटमायर आणि शुभम दुबे यांनीही मोठी फटकेबाजी केली.

### इशानने वादळी शतक झळकावले

हेटमायरने २३ चेंडूत १८२ च्या स्ट्राईक रेटने १ चौकार आणि ४ षटकारांसह ४२ धावा केल्या. तर शुभमने ११ चेंडूत ४ षटकार आणि एका चौकाराच्या मदतीने ३४ धावा केल्या. राजस्थान रॉयल्सचा कर्णधार असलेल्या रियान परागने नाणेफेक जिंकून सनरायझर्स हैदराबाद संघाला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. अभिषेक शर्मा आणि ट्रॅव्हिस हेड यांनी एसआरएचसाठी स्फोटक सुरुवात केली. या दोघांनी मिळून पहिल्या ३ षटकांत ४५ धावा केल्या. यानंतर अभिषेक ११ चेंडूत २४ धावा करत बाद झाला. यानंतर इशान किशनने प्रथमच फ्रँचायझीकडून खेळताना वादळी शतक झळकावले.इशानने अवघ्या ३५ चेंडूत ८५ धावांची भागीदारी केली. १०व्या षटकात ३१ चेंडूत ६७ धावा करून हेड तुषार देशपांडेचा बळी ठरला. पण किशनने आपली तुफानी फलंदाजी सुरूच ठेवत ४५ चेंडूत शतक झळकावले.

# चेन्नईने चेपॉकवर मिळवला विजय!

## पहिली मॅचही देवालाच; सूर्याच्या पलटनने दिली कडवी झुंज

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मुंबई इंडियन्सने नेहमीप्रमाणे आयपीएलमधील पहिला सामना गमावला आहे. चेन्नई सुपर किंग्सने मुंबई इंडियन्सचा ४ विकेट्सने पराभव करत आपलं खातं उघडलं आहे. मुंबईने १५५ धावाच केल्या असल्या तरी त्यांनी चेन्नईला सहज विजय मिळवू दिला नाही. मुंबईने अखेरच्या षटकापर्यंत चेन्नईला विजयासाठी वाट पाहायला लावली. पण चेपॉकचा अभेद्य किल्ला मुंबईचा संघ भेदू शकला नाही.**




चेन्नई सुपर किंग्सला अखेरच्या षटकात विजयासाठी ६ चेंडूत ४ धावांची गरज असताना रचिनने पहिल्याच चेंडूवर षटकार लगावत संघाला विजय मिळवून दिला. मुंबई इंडियन्स संघाने सततच्या विकेट्स गमावल्याने मोठी धावसंख्या उभारू शकले नाही. पण मुंबई इंडियन्सच्या संघाने अखेरपर्यंत हार मानली नाही आणि सीएसकेला विजयासाठी मोठे कष्ट घ्यावे लागले. मुंबई इंडियन्सकडून या सामन्यात पदार्पणवीर युवा खेळाडू विघ्नेश पुथूरने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं. मुंबई इंडियन्सने दिलेल्या १५६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना चेन्नईची सुरुवातही चांगली झाली नाही. राहुल त्रिपाठी दुसऱ्या षटकातच बाद झालाय पण यानंतर ऋतुराज गायकवाडने त्याच्या आयपीएल कारकिर्दीतील सर्वात जलद अर्धशतक झळकावत मुंबई इंडियन्सवर दबाव आणला. पण त्याच्या खेळीसह त्याने मुंबईला बॅकफूटवर टाकले.

यानंतर सर्व फलंदाज एका टोकावरून विकेट गमावत होते, पण रचिन रवींद्रने दुसऱ्या टोकाकडून सीएसकेचा डाव सांभाळत होता. रचिनने ४५ चेंडूत २ चौकार आणि ४ षटकारांसह ६५ धावांची नाबाद खेळी केली. तर जडेजा १७ धावा करत बाद झाला.पण मुंबई इंडियन्सचा युवा गोलंदाज विघ्नेश पुथूरने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं. विघ्नेश पुथूरने त्याच्या आयपीएल पदार्पणात ३ विकेट्स घेतले. त्याच्या ३ विकेट्समुळे सीएसकेचा विजय थोडा कठिण झाला होता. विघ्नेश पुथूरने या सामन्यात ऋतुराज गायकवाड, शिवम दुबे आणि दीपक हुडा अशा मोठ्या आणि ३ महत्त्वाच्या विकेट्स घेतल्या. तर दीपक चहर आणि विल जॅक्स यांनी प्रत्येकी १-१ विकेट मिळवली. मुंबई इंडियन्स चांगली धावसंख्या उभारण्यात अपयशी ठरली, ज्याचा फटका त्यांना बसला.

### मुंबईने अखेरपर्यंत हार मानली नाही

मुंबई इंडियन्सच्या संघाने नाणेफेक गमावत प्रथम फलंदाजीसाठी उतरला. मुंबईची सुरूवात खूपच खराब झाली, रोहित शर्मा ३ चेंडू खेळून डकवर बाद झाला. यानंतर रायन रिकल्टन १३ धावा, विल जॅक्स ११ धावा करत बाद झाले. यानंतर सूर्यकुमार यादव आणि तिलक वर्मांने संघाचा डाव सावरला. अर्धशतकी भागीदारी करत मुंबई इंडियन्सला १०० धावांपर्यंत नेले.यानंतर रॉबिन मिंज ३ धावा, नमन धीर १७ धावा, सँटनर ११ धावा करत बाद झाले. तर दिपक चहरने २८ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. दिपक चहरने १५ चेंडूत २ चौकार आणि २ षटकारांसह २८ धावा केल्या. यासह मुंबई इंडियन्सने ९ बाद १५५ धावा केल्या आहेत आणि सीएसकेला विजयासाठी १५६ धावांचे लक्ष्य दिले. सीएसकेकडून नूर अहमदने ४ विकेट्स घेत सामना फिरवला. तर खलील अहमदने मुंबईला सुरूवातीचे विकेट घेत धक्के दिले आणि ३ विकेट्स नावे केले. तर नॅथन एलिस आणि अश्विन यांनी १-१ विकेट घेतली.चेन्नई सुपर किंग्सला अखेरच्या षटकात विजयासाठी ६ चेंडूत ४ धावांची गरज असताना रचिनने पहिल्याच चेंडूवर षटकार लगावत संघाला विजय मिळवून दिला. पण मुंबई इंडियन्सच्या संघाने अखेरपर्यंत हार मानली नाही आणि सीएसकेला विजयासाठी मोठे कष्ट घ्यावे लागले.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
। सोमवार ।
। दि. 24 मार्च 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती




मोरया शिक्षण संस्था
Computer Vacation Batch
ADMISSIONS OPEN
2025-26
'C' भाषा ₹ १३००/-
'C++' भाषा ₹ १३००/-
बेसिक जावा ₹ १३००/-
स्क्रॅच ॲनिमेशन ₹ १३००/-
बेसिक टॅली ₹ १५००/-
एम.एस. ऑफिस ₹ १५००/-
कोरल ड्रॉ ₹ ११००/-
Adobe AB फोटोशॉप ₹ ११००/-
सर्व कोर्स 20 मार्च 2025 पासून सुरू होत आहेत. इच्छुक पालक, विद्यार्थी व इतर शाळेतील विद्यार्थ्यांनी खालील नंबरवर संपर्क करून प्रवेश निश्चित करावा. अथवा शाळेतील संगणक कक्षात येऊन अधिक माहिती घ्यावी.
ठिकाण: संगणक लॅब, व्ही. के. माटे हायस्कूल, चिंचवड. संपर्क : 8087706100


Since 2000
चला संस्कारक्षम पिढी घडवूया
बालभवन मध्ये सहभागी होऊया
आविष्कार बालभवन
स्वतःचे रंग, रूप, गंध, घेऊन मुलांचे व्यक्तिमत्व फुलवणारे
• चित्रकला
• सूर्यनमस्कार
• प्राणायाम
• मंत्रपठण
• सण उत्सव परंपरा
• श्लोक
• हस्तकला
• गप्पा गोष्टी
• नाट्य
• नृत्य
• क्रीडा प्रकार तोंडओळख
• स्पर्धांची तयारी (श्लोक, वकतृत्व , नाट्यछटा)
विशेष आकर्षण
मंगल स्मृती आविष्कार च्या परीक्षा घेतल्या जातील आणि त्याचे प्रमाणपत्र हि दिले जाईल
हे सर्व एकाच ठिकाणी घेऊन येत आहोत आपल्यासाठी
कालावधी
सोमवार ते शुक्रवार (१ तास )
वयोगट
४–१० वर्षांपर्यंत
Time : 6 pm - 7 Pm | Address : MSS School, Near Shridhar Nagar Garden, Chinchwad
For Admission Contact: 9011270556


MASTER MIND GLOBAL
SCHOOL & Jr. College
(CBSE)
( Since 2013)
ADMISSIONS
OPEN FOR
NURSERY TO 12TH
Where There is
Creativity, There is
Master Mind
7 STAR RANKING
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
A++ Grade
In Leadership & Quality
Management
Website : www.http://mastermindglobalschool.com


WTE
Provider of Sustainable
Water and Waste Water Treatment Solution Globally